**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे**
**महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ कार्यालय इमारत**
**(दुसरा व चौथा मजला) सर्व्हे नं. 832 ए, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे-04**
**दूरध्वनीक्र.:-020-29709617 वेबसाइड:-mscepune.in ई-मेल :-mscegcctbc@gmail.com**

जा.क्र.मरापप/जीसीसी/नवीन शासन मान्यता/२०२६/2926
दिनांक :- 90 /०७/२०२६

## परिपत्रक

विषय :- नियोजित वाणिज्य/संगणक टायपिंग संस्था सुरु करताना परवानगी मिळण्यासाठी सादर करावयाचा ऑनलाईन अर्जाची कार्यपध्दती.

महाराष्ट्र वाणिज्य शिक्षण संस्था (टंकलेखन,लघुलेखन आणि संगणक टंकलेखन अभ्यासक्रम) मान्यता व संचालन नियम १९९१ च्या सुधारित नियमावली २०२३ यास शासन निर्णय क्र.संकीर्ण -०१२१/ प्र.क्र.०४/एसडी-२, दि.२७ एप्रिल २०२३ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.सदर नियमावलीतील प्रकरण २ मधील मुद्दा क्र.१ व २ नुसार नवीन वाणिज्य संस्था सुरु करणेबाबतची कार्यपध्दतीचा उल्लेख केलेला आहे.

सदर कार्यपध्दतीनुसार आजपर्यंत ऑफलाईन नस्ती आवश्यक कागदपत्रांसोबत शिक्षणाधिकारी(माध्यमिक), जिल्हा परिषद, शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई (उ/द/प) व विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय या कार्यालयांच्या शिफारशीनंतर महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या शिफारशीसह शासनास मान्यतेसाठी सादर करण्यात येत होत्या. सदर पध्दतीस अधिक वेळ लागत असल्याने तसेच त्रुटी पूर्तता करुन नस्ती सादर करण्यास अधिक काळ जात असल्याबाबत निदर्शनास आल्याने परीक्षा परिषदेमार्फत नवीन वाणिज्य/संगणक टायपिंग संस्था सुरु करणेबाबतची संपूर्ण कार्यपध्दती ऑनलाईन करणेबाबतचा निर्णय घेण्यात येत आहे.

नवीन वाणिज्य/संगणक संस्था सुरु करणेबाबत अर्ज करणे, अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे सादर करणे , तपासणी करणे व सदर प्रस्तावास शिफारस करणे इत्यादीबाबतची कार्यप्रणाली खालीलप्रमाणे :-

१) नियोजित वाणिज्य/संगणक टायपिंग संस्था सुरु करण्यासाठी अर्ज व सदर अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे इत्यादी सादर करण्यासाठी परीक्षा परिषदेच्या संकेतस्थळावर ऑनलाईन प्रोग्रामच्या माध्यमातून लिंक देण्यात येत आहे. सदरील लिंकद्वारे अर्ज करावयाचा आहे.

२) नवीन वाणिज्य/संगणक टायपिंग संस्था सुरु करण्यासाठीची ऑनलाईन लिंक ही कायमस्वरुपी उपलब्ध राहणार आहे. तसेच या ऑनलाईन माध्यमातूनच यापुढे परवानगी देखील मिळणार असल्यामुळे सदर प्रक्रियेसाठी प्रक्रिया शुल्क/प्रोसेसिंग फी रु.५००० /- आकारण्यात येत आहे.

३) या परिपत्रकासोबत देण्यात येत असलेल्या प्रपत्र -२ नुसार आवश्यक कागदपत्रांसह संपूर्ण माहिती भरण्याची व आवश्यक कागदपत्रे अपलोड करण्याची संपूर्ण जबाबदारी अर्जदाराची असेल.तसेच संपूर्ण माहिती सबमिट केल्यानंतर व प्रक्रिया शुल्क भरलेनंतरच सदरील माहिती शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद/शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई (उ/द/प) यांना त्यांच्या लॉगिंनमध्ये ऑनलाईन प्राप्त होईल.

४) सदरील प्रस्तावात त्रुटी असल्यास त्रुटीबाबत नमूद करुन लगेचच प्रस्ताव संबंधित अर्जदाराकडे ऑनलाईन परत पाठविण्यात यावा. सदरील त्रुटी हया विभागीय उपसंचालक कार्यालय व परीक्षा परिषदेस ऑनलाईन अवलोकन करण्यास/पाहण्यास उपलब्ध असतील.

५) संबंधित अर्जदाराकडून परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त झालेनंतर संबंधित जिल्हयाच्या शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद/शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई (उ/द/प) यांनी सदरील प्रस्तावाबाबतची तपासणी करावी, नियोजित जागेचे स्थळ निरीक्षण करुन स्थळ दर्शक नकाशा ऑनलाईन अपलोड करणे आवश्यक आहे. तसेच सदर नियोजित संस्थेपासून नजीकच्या संस्थांचे गुगलमॅपद्वारे अंतर

तपासणी करुन प्रतिस्वाक्षरी करावी व त्याबाबतचे प्रमाणपत्र अपलोड करावे.तसेच समन्वय समितीबाबतचा अहवाल आपल्या स्वाक्षरीनिशी अपलोड करावयाचा आहे.

६) परिपूर्ण माहिती भरल्यानंतर शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद/शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई (उ/द/प) यांनी उपरोक्त नमूद कार्यपध्दतीबाबत एक महिन्याच्या आत कार्यवाही करुन आपल्या कार्यालयाचे शिफारस पत्र अपलोड करावयाचे आहे. व तद्नंतर सबमिट बटणावर क्लिक करावयाचे आहे.

७) शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद/शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई (उ/द/प) यांनी सबमिट बटणावर क्लिक केल्यानंतर सदरील प्रस्ताव विभागीय शिक्षण उपसंचालक यांना लॉगिनमध्ये ऑनलाईन प्राप्त होईल.

८) विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी सदरील प्रस्तावाची तपासणी करुन काही त्रुटी असल्यास सदरील प्रस्ताव पुन:श्च शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद/शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई (उ/द/प) यांचेकडे त्रुटीपूर्तता करणेसाठी पाठविण्यात येईल.

९) सदरील प्रस्ताव आवश्यक कागदपत्रांसह परिपूर्ण असल्यास पंधरा दिवसाचे आत कार्यवाही करुन विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी शिफारसपत्र अपलोड करुन सबमिट बटण क्लिक करावयाचे आहे.

१०) विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी सबमिट बटणावर क्लिक केल्यानंतर सदरील प्रस्ताव महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद या कार्यालयास ऑनलाईन प्राप्त होईल.

११) परीक्षा परिषद,पुणे या कार्यालयाने सदरील प्रस्तावाची तपासणी करुन काही त्रुटी असल्यास सदरील प्रस्ताव पुन:श्च विभागीय शिक्षण उपसंचालक यांचेकडे त्रुटीपूर्तता करणेसाठी पाठविण्यात येईल.

१२) सदरील ऑनलाईन प्राप्त प्रस्तावाची छाननी करुन प्रस्ताव पूर्ण असल्यास सदरील प्रस्तावास परीक्षा परिषद या कार्यालयाचे शिफारशीसह एक महिन्याच्या आत शासनास ऑनलाईन पाठविण्यात येईल.

१३) शासनस्तरावरुन मान्यता आल्यानंतर संबंधित संस्थेने परीक्षा परिषदेकडून संस्था नोंदणी क्रमांक मिळणेसाठी ऑनलाईन लिंकद्वारे अर्ज करावा.

१४) सदर अर्जासोबत प्रपत्र -१ नुसार परिशिष्ट ए - २ व डी-१ अपलोड करणे बंधनकारक राहील.

१५) सदर अर्जासोबत शासनमान्यता मिळालेले पत्र अपलोड करावे.

१६) शासन निर्णय क्र.संकीर्ण -०१२१/ प्र.क्र.०४/एसडी-२, दि.२७ एप्रिल २०२३ नुसार व्यवस्थापनाच्या आर्थिक स्थैर्याची निश्चिती असेल इतक्या रकमेची म्हणजेच रु.३,००,०००/- ची बँक हमी अपलोड करावी. **(बँक हमी मूळ प्रमाणपत्र परीक्षा परिषद,पुणे या कार्यालयास सादर करावे.)**

१७) शासन निर्णय क्र.संकीर्ण -०१२१/ प्र.क्र.०४/एसडी-२, दि.२७ एप्रिल २०२३ नुसार संस्कारण फी रु.२५,०००/- व अनामत रक्कम रु.७५,०००/- ऑनलाईन भरणा करणेस सुविधा उपलब्ध करुन दिलेली आहे.

१८) संस्था नोंदणी क्रमांक मिळणेबाबतचे परिशिष्ट एन अपलोड करावा.

१९) सदर संस्था नोंदणी क्रमांक मिळणेबाबतचा प्रस्ताव परिपूर्ण (मुद्दा क्र.१४,१५,१६,१७ व १८ नुसार) असल्यास संबंधित संस्थेस परीक्षा परिषदेशी संलग्न सांकेतांक क्रमांक देणेबाबतचे पत्र ऑनलाईन स्वरुपात पाठविले जाईल.

ऑनलाईन माहिती भरताना सॉफ्टवेअर/प्रोग्राममध्ये काही तांत्रिक अडचणी आल्यास महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे प्रोग्रामर यांच्याशी संपर्क साधावा.

१. श्री.नितीन किर्दकर - मो.नं.- 9860485602
   श्री. विकास पवार - मो.नं. - 8669289173

( महेश पालकर )
**आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे-०४**